# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 08 April 2024**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली
- हिंगोलीत ३३, नांदेडमध्ये २३ तर परभणीत ३४ उमेदवार निवडणूक रिंगणात
- मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाचा राजकीय वापर झाल्याप्रकरणी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

आणि

- गुढीपाडव्यानिमित्त बाजारपेठांमध्ये उत्साह

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, परभणी आणि नांदेड या आठ मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व ठिकाणी २६ एप्रिलला मतदान होणार असून, या सर्व मतदार संघातल्या निवडणुकीचं चित्र आता स्पष्ट झालं आहे.

हिंगोली इथं अठ्ठेचाळीस पात्र उमेदवारांपैकी पंधरा जणांनी अर्ज मागे घेतल्याने तेहतीस उमेदवार निवडणूक लढवतील. नांदेड मध्ये सहासष्ट पात्र उमेदवारांपैकी तब्बल त्रेचाळीस जणांनी माघार घेतल्याने तिथे तेवीस उमेदवारांमध्ये निवडणूक होईल, तर परभणी मतदारसंघात एक्केचाळीस पात्र उमेदवारांपैकी सात उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने तिथे चौतीस उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

बुलडाणा मतदारसंघात पात्र ठरलेल्या पंचवीसपैकी चार उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानं आता या मतदार संघात एकवीस उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

अकोला मतदारसंघात पात्र सतरा उमेदवारांपैकी दोघांनी अर्ज मागे घेतल्यानं तिथे पंधरा उमेदवार लढतीत आहेत.

अमरावती मतदारसंघात छप्पन पात्र उमेदवारांपैकी एकोणीस जणांनी अर्ज मागे घेतल्याने तिथे सदोतीस, तर वर्धा मतदारसंघात सव्वीस पात्र उमेदवारांपैकी दोघांनी अर्ज मागे घेतल्याने चोवीस उमेदवार रिंगणात आहेत. यवतमाळ-वाशिम मध्ये वीस पात्र उमेदवारांपैकी तिघांनी अर्ज मागे घेतल्याने सतरा उमेदवारांमध्ये निवडणूक होणार आहे.

परभणीमध्ये महायुतीचे उमेदवार महादेव जानकर हे शिट्टी या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला प्रेशर कुकर हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे. या पक्षानं गॅस सिलिंडर हे निवडणूक चिन्ह मागितलं होतं, मात्र सोडतीमध्ये हे चिन्ह त्यांना मिळालं नाही.

****

देशात लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, विविध पक्षांचे प्रमुख नेते आणि प्रचारक देशाच्या विविध भागात प्रचारसभा घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज महाराष्ट्रात चंद्रपूर आणि गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघासाठी चंद्रपूर इथे सभा घेतली. ही निवडणूक स्थैर्य विरूद्ध अस्थैर्य अशी असल्याचं मोदी यांनी नमूद केलं. या सभेत केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आदी मान्यवरांचीही भाषणं झाली आहेत. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार हे चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून तर विद्यमान खासदार अशोक नेते हे गडचिरोली लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आहेत. पंतप्रधान यानंतर परवा १० तारखेला नागपूर इथं प्रचारसभा घेणार आहेत.

****

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठिंबा देत महायुतीत सहभागी होतील, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्तवली आहे. ते आज नागपूर इथे पत्रकार परिषदेत बोलत होते. मनसेची व्यापक भूमिका भाजपशी सुसंगत असल्याचं सांगत उद्याच्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात मनसे प्रमुखांनी अशी भूमिका मांडल्यास त्याला आपला पाठिंबा राहील, असं फडणवीस यांनी म्हटलं आहे.

****

मुख्यमंत्र्याचे अधिकृत शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा निवासस्थानाचा राजकीय कारणासाठी वापर झाल्यामुळे अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटिशीला उत्तर मिळाल्यावर कारवाई होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. याप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यामुळे मुंबई शहर जिल्हाधिकारी यांनी नोटीस बजावल्याचे ते म्हणाले.

****

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतल्या पक्षांमध्ये ताळमेळ नसल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. ते आज अकोला इथे पत्रकार परिषदेत बोलत होते. वंचित बहुजन आघाडीनं आतापर्यंत एकोणीस जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत, राज्यातल्या उर्वरित जागांबद्दल दोन दिवसात निर्णय जाहीर करणार असल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी सांगितलं.

****

लोकसभा निवडणुकीत काश्मिरी निर्वासित मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी निवडणूक आयोग विशेष व्यवस्था करत आहे. जम्मू, उधमपूर तसंच दिल्लीसह इतरत्र छावण्यांमध्ये राहणाऱ्या या निर्वासितांना टपाली मतपत्रिकेच्या माध्यमातून मतदान करता येणार आहे. निवडणूक आयोगाचे सचिव बी सी पात्रा यांनी केंद्रीय गृहमंत्रालयाला याबाबत पत्र लिहून आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या आहेत.

****

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते अमोल कीर्तिकर आज अंमलबजावणी संचालनालय-ईडी च्या कार्यालयात चौकशीसाठी हजर झाले. मुंबई महापालिकेतल्या कथित खिचडी घोटाळा प्रकरणात ईडीनं त्यांना गेल्या पंचवीस तारखेला समन बजावलं होतं. कोरोना साथरोगाच्या काळात मुंबईत गरीब स्थलांतरीत कामगारांसाठी जेवणाची व्यवस्था करण्याचा निर्णय तत्कालीन सरकारनं घेतल्यानंतर या कामगारांना खिचडी देण्याचं कंत्राट मुंबई महापालिकेनं बावन्न कंपन्यांना दिलं होतं, यामध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला असून त्याची चौकशी सुरू आहे. दरम्यान, शिवसेना ठाकरे गटानं अमोल कीर्तिकर यांना लोकसभेची उमेदवारी दिली आहे.

****

दिल्लीतल्या कथित मद्यधोरण घोटाळ्याप्रकरणी तुरुंगात असलेल्या भारत राष्ट्र समिती पक्षाच्या नेत्या के कविता यांना जामीन देण्याला आज दिल्लीतल्या विशेष सीबीआय न्यायालयानं नकार दिला. मुलाच्या परीक्षेसाठी कविता यांनी जामीनाची मागणी केली होती. जामीन मिळाला तर कविता पुरावे नष्ट करतील आणि साक्षीदारांना प्रभावित करतील असा दावा करत सक्तवसुली संचलनालयानं या जामीनाला विरोध केला. कविता यांना ९ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी १५ मार्च रोजी त्यांना अटक झाली होती.

****

राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण परभणी लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद –एनसीईआरटीनं त्यांच्या शैक्षणिक साहित्यावरील स्वामित्व हक्कांबाबत निर्देश जारी केले आहेत. जर एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेनं परवानगीशिवाय एनसीईआरटीची अधिकृत पाठ्यपुस्तकं व्यावसायिक वापरांसाठी प्रकाशित केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा परिषदेनं दिला आहे.

****

हिंदू कालगणनेनुसार नवीन वर्षाला उद्या चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यापासून प्रारंभ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चंद्रपुरात जाहीर सभेतून जनतेला मराठीतून गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

राज्यपाल रमेश बैस यांनी गुढी पाडवा तसंच मराठी नववर्षानिमित्त राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या विविध भागात हा सण चैत्र शुक्लादी, युगादि, संसर पाडवो आणि चेटी चंड म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त लोकांमधला परस्पर स्नेह, बंधुभाव आणि एकोपा वृद्धिंगत होवो, या प्रार्थनेसह सर्वांना गुढीपाडवा आणि नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

****

हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या निमित्तानं छत्रपती संभाजीनगरमध्ये दरवर्षी परंपरेनं गुलमंडी इथे गुढी उभारण्यात येते. उद्याही इथे सकाळी ९ वाजता शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते गुढीपूजन होणार आहे.

दरम्यान, गुढीपाडव्यासाठी बाजारपेठा सजल्या आहेत. गुढी उभारण्यासाठी लागणाऱ्या बांबूच्या काठ्या, साखरगाठ्यांसह पूजा साहित्याची दुकानं ग्राहकांच्या गर्दीनं फुलून गेली आहेत. गुढीपाडवा हा साडे तीन शुभ मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त मानला जातो, या मुहूर्तावर इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहनं आणि आभुषणं खरेदीसाठी नागरिक गर्दी करत असल्याचं, दिसून येत आहे.

****

राज्यात आज सोलापूर इथे बेचाळीस पूर्णांक दोन अंश सेल्शियस या कमाल तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात बीड इथं सर्वाधिक ४० पूर्णांक चार दशांश, नांदेड चाळीस पूर्णांक दोन, धाराशिव इथं चाळीस, परभणी इथं एकोणचाळीस पूर्णांक चार दशांश तर छत्रपती संभाजीनगर इथं आज सदतीस पूर्णांक चार दशांश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

दरम्यान, येत्या पाच दिवसात मराठवाड्यातल्या नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी आणि बीड या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

****